# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- ११९-२३ दिनांक :- १२/०४/२०२३

## वेदांत इंटरनॅशनल स्कुल व ज्युनियर कॉलेज येथे सायबर गुन्हे कक्षाकडून शालेय विदयार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील शालेय शिक्षण घेणाऱ्या विदयार्थांमध्ये सायबर गुन्हयांचे अनुषंगाने जनजागृती व्हावी याकरीता वेदांत इंटरनॅशनल स्कुल, ज्युनियर कॉलेज व सायबर गुन्हे कक्ष, मि.भा.व.वि. यांचे संयुक्त विदयमाने दिनांक ११ एप्रिल २०२३ रोजी वेदांत इंटरनॅशनल स्कूल व ज्युनीयर कॉलेज येथे विद्यार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

सदर विदयार्थी संवाद मेळावामध्ये विद्यार्थी यांना दैंनदीन सोशल मिडीया वापराबाबत व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये होणारे विविध प्रकारचे गुन्हे याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली तसेच विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाबाबत असलेले गैरसमज, त्यांचे प्रश्नांचे निरसन करण्यात आले.

सदर विदयार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन श्री. अविनाश अंबूरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर यांचे उपस्थितीत पार पडला. सदर संवाद मेळाव्याकरीता वेदांता इंटरनॅशनल स्कुलच्या प्राचार्य श्रीमती सुजाता जाधव यांचेसह १५ शिक्षक व आठवी, नववी, दहावी चे एकूण २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.





-------ooooo-------